# श्री साईनाथ प्रसन्न

लेखकः—गो. र. दाभोळकर.

सदा सेव्या सदा सेव्या श्रीमद्भागवती कथा
यस्याः श्रवण मात्रेण हरिश्चित्तं समाश्रयेत्
( पद्मपुराण )

श्रीसमर्थ साईमहाराज यांचें एकनाथी भागवत व भावार्थ रामायणावर फार प्रेम असे. ते स्वत: कधीं ते ग्रंथ वाचीत किंवा त्याचे परिशीलन किंवा त्यावर प्रवचन करीत असे नाहीं.पण आपल्या दर्शनास येणारे भक्तांनीं हे ग्रंथ वाचावे व आपले नित्यपाठांत ठेवावे व त्यांतील प्रमेये आपले आचरणांत आणावीं अशी त्याची मनापासून फार इच्छा असे. याचा अर्थ इतर प्रसिद्ध संतांचे पारमार्थिक ग्रंथाबद्दल त्यांचा आदर कमी होता असें बिलकूल नाहीं. श्रीमद्भगवद्गीता, उपनिषदे, ज्ञानेश्वरी, नामदेव--तुकारामादिकांच्या अभंगाच्या गाथा, कृष्णदयार्णवाचा दशमस्कंध, महाभारतांतर्गत विष्णूसहस्रनाम -इत्यादि ग्रंथाबद्दलही त्यांना तशीच आदरबुद्धि होती.

यांपैकीं एकनाथी भागवत व ज्ञानेश्वरी हे दोन ग्रंथ तर त्यांचे मशिदी नजीकचे साठे साहेबांचे वाड्यांत त्यांचे भक्त कै. सखाराम हरी उर्फ बापूसाहेब जोग यांजकडून प्रत्यही दोन प्रहरीं आळीपाळीने वाचवीत व मशीदींत दुपारचे वेळीं आपले पादसंवाहन अगर अशाच प्रकारची कोणतीही सेवा करावयास आलेल्या किंवा बसलेल्या कित्येक भक्तांस बाबा पुष्कळदां दक्षिणा मागून आणण्याच्या मिषानें पोथी ऐकण्याकरितां बापूसाहेबांकडे पाठवीत व अशा वेळीं बहुधा बापूसाहेब ते ग्रंथ वाचीत असता हे भक्त बापूसाहेबांचे सांगण्यावरून पोथी ऐकण्यास बसत व वाचन संपल्यावर दक्षिणेचा बाबांचा निरोप बापूसाहेबांस देत व जितकी दक्षिणा मागितली असेल तितके आमचे नमस्कार बाबांस सांगा

असा बापूसाहेबांचा निरोप घेऊन तासा दोन तासांनीं हे भक्त बाबाकडे परत येत व तो निरोप बाबास सांगत. एकदा कै. बा. हरी सीताराम उर्फ काकासाहेब दीक्षित याजला बाबांनीं त्यांचे वाडयात एकसारखे नऊ महिने बसवून ठेवल्या वेळीं त्याना भागवताचे दशमस्कंधावरील हरिवरदा नामक मराठी टीकात्मक एक मोठा ग्रंथ आहे तो वाचीत राहण्याची आज्ञा केली. तो वाचून झाल्यावर दिवसा एकनाथी भागवत व रात्रीं भावार्थ रामायण वाचण्याची बाबाची आज्ञा झाली व काकासाहेबांनीं ती आज्ञा अक्षरशः पाळली. नाथांनीं या एकादशस्कंधाच्या टीकात्मक ग्रंथरचनेस पैठणास प्रारंभ केला, पंचाध्यायी तेथेच पुरी केली व पुढील सव्वीस अध्याय श्रीक्षेत्र काशींत लिहिले. शके १४९५ श्रीमुखसंवत्सरांत हा ग्रंथ त्यांनी पूर्ण केला. हा ग्रंथ असामान्य आहे. नाथाचा एक शिष्य नाथाचे पंचाध्यायीची एक नक्कल घेऊन काशीयात्रेला गेले असतां प्रातःकाळीं भागीरथीचे स्नान करून पंचाध्यायी वाचण्याचा त्यांचा नेम पाहून काशीकर शास्त्र्याचे नजरेस ही गोष्ट येताच संस्कृत भागवतावर प्राकृतांत ओव्या करण्याचे नाथाचे धाडस त्याना खपले नाहीं. तेणेंकरून संस्कृत भाषेचे पावित्र्य नष्ट करण्याचा नाथानीं प्रयत्न करण्याचा त्यांजवर आरोप करून काशीक्षेत्रीं सभा भरवून त्यांचा जाहीर रीतीनें निषेध करून त्यास दंड करण्याचें ठरून नाथांस बोलावणें पाठविलें त्या सुमारास नाथमहाराजांचें वय सुमारें २३ वर्षांचे असून गुर्वाज्ञेने नुकताच कोठें गृहस्थाश्रम स्वीकारला होता. हें बोलावणे म्हणजे हा काशीविश्वेश्वराचा प्रसाद असें मानून नाथ काशीस गेलें. तेथे ती त्यांची शांत वृत्ति, त्यांची गुरुभक्ति, त्यांचें अप्रतिम वक्तृत्व व त्यांचें अतिसरळ व प्रेमळ वर्तन पाहून त्यांच्या दर्शनास काशीकरांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागून काशीकर शास्त्र्यांची व पंडितांचीं त्यांच्याबद्दलची मते हळू हळू बदलूं लागलीं. इकडे नाथांचे अध्यायावर अध्याय पुरे होतां होतां काशीस त्यांच्या भागवताचे २६ अध्याय पुरे होतांच सभा भरवून सबंध ग्रंथाची छाननी झाली व नाथांस

दंड करण्याचा ठराव होण्याचे बदला भागवताचा एकादशस्कंध नाथांनीं मराठी भापेचे कोंदणात फार सुंदर रीतीनें जडविल्याबद्दल त्याची तारीफ होऊन काशीकरशास्त्री पंडितांनीं ग्रंथाची पालखींतून मिरवणूक काढली, पूजा केली व नाथांचा जयजयकार केला

अशा या लोकोत्तर ग्रंथास श्री साईबाबा हे एकनाथाची वृंदावनाची पोथी म्हणत. कृष्णदयार्णवाच्या हरिवरदाचे एक पारायण झाल्यावर आता पुढें काय वाचूं म्हणून काकासाहेब दीक्षितांनीं बाबांस विचारले तेंव्हा आता एकनाथाची वृंदावनाची पोथी वाच म्हणून आज्ञा झाली. तेंव्हां ही कोणती पोथी ते नीट कळेना तेंव्हां नाथभागवातचा सुप्रसिद्ध ग्रंथ कै. वा. काकासाहेबांनीं बाबांस नेऊन दाखविला व आपण ज्याला वृंदावनाची पोथी म्हणतां तो ग्रंथ याहून आणखी निराळा आहे काय म्हणून विचारतां बाबा म्हणाले कीं, हीच ती वृंदावनाची पोथी. व पुढे हें भागवत वाचता वाचता शेवटले म्हणजे ३१ वे अध्यायाचे अंतीं जेंव्हां खालील ओवी दीक्षितांस आढळली तेंव्हां त्यांना बाबांचे बोलाचें कौतुक किती वाटले असावे याचा वाचकानींच विचार करावा.

ती ओवी अशी:—

हा एकादश नव्हे जाण। एकतिसां खणांचें वृंदावन ॥
एथ नित्य वसे श्रीकृष्ण। स्वानंद पूर्ण निजसत्ता ॥ ६७ ॥

एकदां असें झालें कीं,त्याचे एका स्नेह्यानें ज्याच्यांत श्रीमद्भगवद्गीतेवर उत्तमोत्तम सात टीका आहेत असा एक मोठा ग्रंथ मोठ्या प्रेमानें खरेदी करून काकासाहेबानीं तो वाचावा म्हणून त्यास अर्पण केला. त्याचा त्यांनीं आनंदानें स्वीकार केला व एक दिवस संधि पाहून तो ग्रंथ दीक्षितांनीं बाबांचे हातीं देऊन त्यासंबंधानें झालेली हकीकत बाबांस निवेदन करून तो वाचूं का म्हणून परवानगी विचारतां बाबांनीं त्या ग्रंथाचीं कांहीं पानें चाळून काका-

साहेबास परत दिला व म्हणाले, "आपल्या दोन पोथ्या आपल्याला गंज आहेत" ( म्हणजे एकनाथी भागवत व भावार्थरामायण )

तात्पर्य या आज्ञेचे परिपालन काकासाहेबानीं अखेरपर्यंत अगदीं अव्याहतपणें केले. त्याना मराठी, हिंदी, संस्कृत व इंग्लिश या भाषा फार चांगल्या येत असता व या भाषेतील अनेक उत्तम ग्रंथानीं त्यांचीं कपाटे भरलेलीं असता या दोन ग्रंथाखेरीज त्यानीं परमार्थपर तिसरा ग्रंथ आमरण वाचला नाहीं. त्याच्या सहवासात मलाही या दोन ग्रंथाविषयीं फार आवड उत्पन्न होऊन ते वक्ते व मी श्रोता असा त्याचा माझा संबंध वर्ष दोन वर्षे नियमाने आल्यामुळे त्या दोन्ही ग्रंथातील काहीं अप्रतिम भाग सारूपानें श्रीसाईलीलेचे वाचकास वेळोवेळीं देत गेल्याने त्या रूपानें तरी श्रीसाईबाबाची व त्याचे भक्ताची एक सेवाच केल्यासारखे होईल असे वाटल्यावरून ती करावयास मी आजपासून सुरुवात करीत आहे.

श्रीरामचंद्राने रावणास निजबोध बाण मारल्यानंतर श्रीरामचंद्राच्या व सीतेच्या योग्यतेबद्दल व अधिकाराबद्दल रावणाचे उद्गार ( श्रीएकनाथ महाराजाचे प्रसिद्ध शिष्य गावबा याचे भाषेंत ) फार अमूल्य व बोधप्रद आहेत ते येणेंप्रमाणें:—

**ऐका गा हे सेनास्थित । नर वानर राक्षस बहुत ॥**
**उभय सेनेचे समस्त । माझा वचनार्थ परिसावा ॥ २ ॥**
**ऐकोत देवदानव । यक्ष आणि गंधर्व ॥**
**सिद्ध चारणादि सर्व । श्रीराम वैभव परिसोत ॥ ३ ॥**
**श्रीराम माणूस नव्हे जाण । राम सर्वांतर्यामीं पूर्ण ॥**
**राम सर्वातीत सनातन । राम चिद्घन चिन्मूर्ति ॥ ४ ॥**
**राम सकल लोककर्ता । राम ब्रह्मादिकां पाळिता ॥**
**राम काळाचा आकळिता । सकळांचे माथा श्रीराम ॥ ५ ॥**

श्रीराम आदि हेतु उत्पत्ती । राम स्थितीची निजस्थिती ॥
राम विश्रांतीची विश्रांती । गतीची गती श्रीराम ॥ ६ ॥

रामे बोलविल्या वेद बोले । रामें चाळविल्या वायु चाले ॥
रामें चाळिल्या प्राण चळे । जेणें रक्षिले देहमात्र ॥ ७ ॥

रामें प्रकाशिला भास्कर । झाला सकळां प्रकाशकर ॥
रामें निववि‍ला हिमकर । निववी साचार सकळांसी ॥ ८ ॥

रामें धरिली धरा राहे । राम जीवनी जिववि‍ताहे ॥
श्रीराम तेजे पावक पाहें । देदीप्त होय पाचनीं ॥ ९ ॥

रामें मोकलितां सावकाश । गगनीं उदंड अवकाश ॥
राम विस्मरणी अहंकारास । अतिउल्लास देह बुद्धी ॥ १० ॥

राम इंद्राचा आदि इंद्र । राम नरेंद्राचा नरेंद्र ॥
राम यमाचा संहारकर । ईश्वरा ईश्वर श्रीराम ॥ ११ ॥

श्रीरामे चेतविलें पाहें । चित्त चेतनेतें धरिताहे ॥
रामे अधिष्ठिला होये । बोध स्वये बुद्धीसीं ॥ १२ ॥

श्रीरामप्रभावे अल्प । मनीं स्फुरती संकल्प ।
त्या श्रीरामाचें स्वरूप । वाग्जल्प कैंवी जल्पे ॥ १३ ॥

श्रीराम रणीं रणकल्लोळ । रामकृपाळुवां कृपाळ ॥
राम दीनांचा दयाळ । प्रणतपाळ श्रीराम ॥ १४ ॥

देहदरिद्रें पीडतां । देखोन मज लंकानाथा ॥
कृपा उपजली रघुनाथा । वना तत्वतां तेणें आला ॥ १५ ॥
छळोनियां कैकेयी माता । वना धाडिलें श्रीरघुनाथा ॥
उद्धरावया लंकानाथा । वना तत्वतां राम धाडी ॥ १६ ॥

श्रीरामाचा गुरु वसिष्ठ । तो माझा परम गुरु श्रेष्ठ ॥
वसिष्ठें अनिष्ट इष्ट । कळलें स्पष्ट आजि मज ॥ १७ ॥

प्रबोधोनी सकळांसी । सर्वे दीधलें जानकीसी ।
हें अद्यापि कोणासी । जनीं जनासीं लक्षेना ॥ १८ ॥

उद्धरावया रावण । सद्गुरूसीं कळवळा पूर्ण ।
तेणें जानकीसी देऊन । रघुनंदन पाठविला ॥ १९ ॥

श्रीरामाची निजशक्ती । सीता पतिव्रता महासती ॥
अनुग्रहावया लंकापती । लंकेप्रती स्वयें आली ॥ २० ॥

रावण बापुडें अतिदीन । तें केवीं करी सीताहरण ॥
स्वयेंचि येवोनि आपण । दशानन उद्धरिला ॥ २१ ॥

जाणे स्वामीचे मनोगत । निरपराधें न करी घात ॥
करोनि अपराधी लंकानाथ । श्रीरामे घात करूं आली ॥ २२ ॥

श्रीरामाची निजशक्ति सीता । सती शिरोमणी पतिव्रता ॥
विश्वाची ते विश्वमाता । लंकानाथा कळवळिली ॥ २३ ॥

मिनधा कोप वरी वरी । माता कृपाळ अंतरीं ॥
कृपें कोपोनि रावणावरी । सहपरिवारीं उद्धरला ॥ २४ ॥

श्रीरामाचा नव्हे बाण । सायुज्याचा मुळहारी पूर्ण ॥
छेदूनि माझें दशवदन । विश्वमुखपूर्ण मज केलें ॥ २५ ॥

जितुकें रामाचें पूर्णपण । तितुकी माझी व्याप्ति पूर्ण ॥
लागतां श्रीरामाचा बाण । एवढी स्थिती जाण मज आली ॥ २६ ॥

अनंत ब्रह्मांडें ज्यामाजि,जाण । तो मज माजी रघुनंदन ॥
सगळा बुडाला आपण । एवढें पूर्णपण मज आलें ॥ २७ ।

श्रीरामे वधिला रावण । कीं रावणें राम गिळिला पूर्ण ॥
दोघांचेंही दोहीपण । हरपोनी पूर्ण श्रीराम झालें ॥ २८ ॥

अवनीदहन जीवन जाण । पवने सहित गगन ।
श्रीरामाचें रामपण । स्वये रावण होऊन ठेला ॥ २९ ॥

माझें रावणपण देख । राम झाला स्वये एक ॥
त्रिसप्त चौदा लोक । लोकालोक तेथें कैंचे ॥ ३० ॥

सकळ सुखांचें सोलींव सुख । स्वयें श्रीराम सम्यक ॥
त्याचाही प्रकाशक । रावण देख मी झालों ॥ ३१ ॥

चंद्र किरणीचें अमृत । जेंवी सोमकांतें द्रवत ॥
तेंवी श्रीराम सुखसमस्त । माझेनि प्रगटत जगामाजि ॥ ३२ ॥

म्यां विरोधिलें नाहीं श्रीरामासी । उद्धरावया सकल कुळासी ॥
हिरोनि आणिलें जानकीसी । त्या भावार्थासी सांगेन ॥ ३३ ॥

जेथें जेथें अधिष्ठान । श्रीरामाचें संपूर्ण ॥
त्यांचें करोनि निरोधन । कुळ उद्धरण म्यां केलें ॥ ३४ ॥

श्रीराम कृपा सनातन । देवांवरी आहे पूर्ण ॥
म्हणोनियां निरोधन । केलें आपण देवांचें ॥ ३५ ॥

सीता रामाची शक्ती । ते म्यां आणिली याचि प्रीतीं ॥
धांवोनि येईल रघुपती । देईल मुक्ती सकळांसी ॥ ३६ ॥

आपुले मागावया ठेवणें । वोल धरिती शाहाणें ॥
तैसे म्यां केले रावणें । कोप झणे कोणी म्हणा ॥ ३७ ॥

उद्धरावया सकळ कुळासी । म्यां ओली धरिली सीतेसी ॥
त्या ओलीलागीं राघवासी । निज मानसीं कळवळा ॥ ३८ ॥

अति प्रीतीं श्रीरघुपती । ओल सोडवावया निश्चितीं ॥
येथें येवोनि शीघ्रगती । सकुळ लंकापती उद्धरिला ॥ ३९ ॥
लागतां श्रीरामाचा बाण । चहूं देहांसी त्रिपुटीचे भान ॥
एकाएकीं छेदून पूर्ण । चैतन्यघन मज केलें ॥ ४० ॥
श्रीरामाचा तो नव्हे शर । चैतन्याचा धांवणेकर ॥
सकळ कुळेसी दशवक्र । केला चिन्मात्र निमेषार्धें ॥ ४१ ॥
दिवस मास न लागतां । संधान आवेशें करितां ॥
उडाली शून्याची शून्य वार्ता । चिदाभासला कोंदली ॥ ४२ ॥
हे तमात दृष्टांत । न रिघे ज्याचे शिंवे आंत ॥
तो पूर्णब्रह्म रघुनाथ । सदोदित कोंदला ॥ ४३ ॥
न दिसे रामाचें रामपण । सौमित्रादि सुग्रीव सहसैन्य ॥
सहसैन्य बुडाला रावण । चैतन्यघन कोंदला ॥ ४४ ॥
जेथें परतल्या श्रुती । उपनिषदें मौनावती ॥
शास्त्रें थोंटावलीं ठाती । रघुपती देखतां ॥ ४५ ॥

—भावार्थरामायण युद्धकांड अध्याय ६३.

याप्रमाणे श्रीरामचंद्राचें स्तवन करून काम, क्रोध, रागद्वेषादि जे आपले नित्याचे व प्रेमाचे जिवलग त्या सर्वांस रावण व ते सर्व रावणास विनवणी करीत आहेत. तो बोधप्रद प्रसंगही फार लक्षांत ठेवण्याजोगा आहे तो येणेप्रमाणें:—

रागादिक समुदायासी । माझें लोटांगण सकळांसी ॥
विनवीत आहें तुम्हांसी । ते विनंतीसी परिसावें ॥ ४७ ॥
तुमचे संगतीस्तव जाण । तुमचेनि धर्म करून ॥
विविध भोग दारुण । म्यां संपूर्ण भोगिले ॥ ४८ ॥

सज्जनांची ऐशी स्थिती । अवंचक मित्र कार्यार्थी ।
मज अनुग्रहिलें रघुपतीं । निज विश्रांती द्यावया ॥ ४९ ॥

माझे पुत्रपौत्रादि प्रधान । बंधुसहित सकळ सैन्य ॥
मजही आधीं माझे जन । श्रीरामें आपण उद्धरिले ॥ ५० ॥

सकळ कुळा देवोनि मुक्ती । मजही उद्धरावया निश्चितीं ॥
राम उभा रणाप्रती । म्हणोनि तुम्हांप्रती प्रार्थितों ॥ ५१ ॥

तुम्हां वेगळा मोक्ष घेतां । लागों पाहे वंचकता ॥
म्हणोनियां तुम्ही आतां । भजा रघुनाथा सर्वभावें ॥ ५२ ॥

विनवित असें कामासी । भजावें निष्काम रामासी ॥
तेणे निजसुख पावसी । अनायासीं श्रीरामे ॥ ५३ ॥

द्वेषा तुज लोटांगण । निर्द्वेष रघुनंदन ॥
तुवां भजुनी अविच्छन्न । पावावें कल्याण शांतीचे ॥ ५४ ॥

वासनादिकां समस्तांसी । माझें लोटांगण सर्वांसी ॥
निर्वासना श्रीरामासी । अविकळतेसीं भजावें ॥ ५५ ॥

तेणें तुम्हां निजसुख । वेगें पावाल आवश्यक ॥
या लागीं मिळोनि सकळिक । रघुकुळटिळक भजावा ॥ ५६ ॥

ऐसें विनवितां रावण । तंव हासिन्नले कामादिगण ॥
तुझें तुज न कळे चिन्ह । श्रीरघुनंदन निजकृपा ॥ ५७ ॥

आमची वस्ती अंतरीं । राम अंतर्यामीं निर्धारीं ॥
तो पूर्वींच आम्हांवरी । अनुग्रह करी तुजहूनी ॥ ५८ ॥

पूर्वीं सर्व भावेंसीं । आम्ही अनुसरलों राघवासी ॥
तरीच श्रीरामें रावणा तुजसी । अतिप्रीतीसी अंगीकारिलें ॥ ५९ ॥

आम्हीं अनुसरलों नसतां । कृपा तया रघुनाथा ॥
नय नये गा सर्वथा । जाण तत्वतां लंकेशा ॥ ६० ॥

तूं अमुचा निजसखा । तुझेनि धर्में सकळिकां ॥
भेटी झाली रघुकुळटिळका । अनंत सुखा मेळविलें ॥ ६१ ॥

ऐसें परस्परें येरयेर । कामादिक पैं समग्र ॥
आणि स्वये दशवक्र । येरेयेर स्तवितातीं ॥ ६२ ॥

तंव श्रीरामाचा निज बाण । करी शिरांचें छेदन ॥
तरी पडेना दशानन । विस्मित बाण स्वयें झाला ॥ ६३ ॥

देखोनि बाणाचा विस्मयो । रावण बोलतसे पहा हो ॥
श्रीरामाचा पूर्णानुग्रहो । तुज स्वयमेवो कळेना ॥ ६४ ॥

श्रीरामामृतकूपिका । अखंड माझे हृदयीं देखा ॥
ते प्रसवत असे मुखां । तुझा आवांका तो किती ॥ ६५ ॥

प्रकाशावया निज महिमान । शिरें प्रसवत रघुनंदन ॥
लाजलीं तुझी आंगवण । नामामृत जाण अनिवार ॥ ६६ ॥

निग्रहो द्यावा तुम्हांसी । राम प्रसवत शिरांसी ॥
अद्यापि नकळे तुम्हांसी । जरी अहर्निशीं जिवलग ॥ ६७ ॥

ऐकोनि रावणाचें वचन । लाजा संकोचला बाण ॥
अलोट नामाचें महिमान । माझी आंगवण ते किती ॥ ६८ ॥

अहर्निशीं जवळी असतां । श्रीराम महिमा तत्वतां ॥
नकळे नकळे सर्वथा । आलों वृथा संसारा ॥ ६९ ॥

गुळामाजील दगड । सर्वांगीं दिसे जैसा गोड ॥
परि पाकीं दावी निवाड । अति अवघड कठिणत्वें ॥ ७० ॥

श्रीरामाचे निजभातां । आम्हीं अहर्निशी जवळी असतां ॥
श्रीराम न कळे तत्वतां । काय आतां वलेजों ॥ ७१ ॥

श्रीराम वैभव नेणोन । स्वयें योटावला बाण ॥
क्षीण माझी आंगवण । करूं कंदन राहिला ॥ ७२ ॥
तें देखोनि दशानन । नमिता झाला श्रीराम बाण ॥
तुझेंनि धर्में आम्हां जाण । वैभवज्ञान रामाचें ॥ ७३ ॥
कंठीं लागतां तुझा घावो । हृदयीं झाला आविर्भावो ॥
सर्वसाक्षी श्रीरामरावो । अद्वितीय अखंड ॥ ७४ ॥
अद्वितीय श्रीरघुनाथ । ऐसा बाणला इत्यर्थ ॥
तेचि नामामृत कूपिका येथ । शिरें अनंत प्रसवती ॥ ७५ ॥
एकदेशी परिच्छिन्न । होतों करंटा दशवदन ॥
तो सर्वगत सनातन । श्रीरघुनंदन स्वयें झालों ॥ ७६ ॥
तरी सज्जनांचा ऐसा महिमा । भेटलिया उत्तमाधमां ॥
उडवोनि द्वंद्वधर्मा । निजधामा पावविती ॥ ७७ ॥
चोरटा वाल्मीक तत्वतां । नारद भेटला अवचितां ॥
निरसोनि मागील दुरिता । अनागत वक्ता पैं केला ॥ ७८ ॥
तैसें तुझे आघाते येथ । निरसूनि माझीं सकळ दुरित ।
पावविलों श्रीरघुनाथ । कृतकृत्य करूनी ॥ ७९ ॥
परस्परे दोघेजण । येरयेरांचें करितां स्तवन ॥
शब्दासी उपरति होऊनि पूर्ण । समाधान पावले ॥ ८० ॥
उपरति होवोनि शब्दांसी । स्मरतां श्रीराम स्वरूपासी ॥
बाहेर देहाची दशा कैसी । न कळतां भूमीसीं उलंडले ॥ ८१ ॥
रावणाचीं पंचमहाभूतें । मिनलीं भूतात्म्या श्रीरामातें ॥
इंद्रिय चेष्टाही तेथें । चिन्मूर्तीतें विनटल्या ॥ ८२ ॥

-भा. रा. युद्धकांड अध्याय ६३

## ह. भ. परायण रा. रा. गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे ऊर्फ दासगणू महाराज यांचीं निवडक पदें

पद ( श्रीरंगा दे० )

विठोबा हे भीमातटवासा देवा धांव रे
केशवा झडकर पद मज दावा देवा धांव रे
नारायणा नको करूं माझी दैना देवा धांव रे
माधवा अनाथ पदरीं घ्यावा देवा धांव रे
गोविंदा परम विमल सुखकंदा देवा धांव रे
श्रीविष्णू किति तरी तव गुण वानूं देवा धांव रे
मधुसुदना रामा-दशमुख हनना देवा धांव रे
त्रिविक्रमा तूंच पोशिता आम्हां देवा धांव रे
वामना बटुवेषा अघशमना देवा धांव रे
श्रीधरा त्रिताप वेगें वारा देवा धांव रे
हृषिकेशा आद्या पुराणपुरुषा देवा धांव रे
पद्मनाभा तूं कैवल्याचा गाभा देवा धांव रे
दामोदरा जगत्रयां तूं असरा देवा धांव रे
संकर्षणा करिं मम भवभयहरणा देवा धांव रे
वासुदेवा घ्यावी मम करिं सेवा देवा धांव रे
प्रद्युम्ना लागत मी तव चरणा देवा धांव रे
अनिरुद्धा धरीं न मजविशीं क्रोधा देवा धांव रे
पुरुषोत्तमा मुनिमानस विश्रामा देवा धांव रे

ऐसे तुमको दूध पिळावे
गोकुल मो ब्रिजनारी ॥ तो० १ ॥

जगत तुमरो लागत पय्या
ओ तुमब्रिजमो चारत गय्या
राधा करत टटोरी ॥ तो० २ ॥

दासीभयी है लछमी तुम्हारी
सबके कारण तुम गिरिधारी
करे गोरस चोरी ॥ तो० ३ ॥

पद

भक्तिपथाविण इतर पंथ ते असार कांहिं न रया
नरा ! भज पंढरपुर वासिया ॥ ध्रु० ॥

चराचरां या व्यापुनि उरला स्थावर जंगम हरी
उभा तो पाहिं विटेच्या वरी
मुक्तिपेठ वैकुंठपती बोभाट बहुत दुरवरी
अशीही क्षेत्रराज पंढरी
कवडि नलागे दवडिन घटका षड्रिपु सारुनिदुरी
भक्तिनें भजन हरीचें करी
चालः—संसार नव्हे दुःखाचा केवळ मळा
त्यामध्यें न अपुला गोवुन घ्यावा गळा
हा कठिण जरी तुज उकलायाला पिळा
तरि सद्गुरुला शरण रिघावें येइल त्यासी दया ॥नरा० १॥

पळ, घटिका, दिन, मास चालले आयु धांवतें पुढें
कसा ना बघसि तयाच्याकडे
वित्त लाघतां चित्त सुखाच्या मृगजळ--डोहीं बुडे
परी ते तुला शेवटीं नडे
ठुमकत येतां मुरडन कांता बालक घेउन कडे
तुला तिज बघतां धुंदी चढे
खोटी माया, झूट पसारा, तूं मेल्या ती रडे
पेटिला कुलुप घालुनी बडे
चालः—मग मान मरातब सांग राहतो कुठें ?
जें तुझ्या आयुची तटकन दोरी तुटे
ना इलाज जन जें यम--पाचारण सुटे
येतिल रडतिल क्षणभर वरवर तुज भंवतीं बसुनियां ॥नरा० २

जन्ममृत्युची खेप चुकविण्या भक्तिपताका करीं
पाहिजे धरिली अत्यादरीं
शाब्दिक वेदांत्याची बडबड ऐकुं नको क्षणभरी
समुळ ती नाश तुझा बा करी
निश्चय, विश्वासाला अपुले आधि सौंगडी करी
क्षमेला स्थळ द्यावें अंतरीं
भूतदया ती जागृत ठेवीं सत्य तशी वैखरी
तझा मग सहजचि विकला हरी
चाः—फुटलेत पाहिजे प्रेमाचे पाझर
बोलणें जणूं का रायपुरी साखर

साधका असावें मन जणुं गंगानिर
अशीं व्रतें पाळिल्या गणु म्हणे येइल विठु प्रत्यया
नरा ! भज पंढरपुरवासिया ॥ ३ ॥

पद

ढोंग धत्तुरा माजवुनीयां जन नादीं लाविती
अशाला भेटेल का श्रीपती ॥ध्रृ०॥
भालिं टिळे ढळढळीत चंदनी लावुन चतुराइचे
जणूं का सिग्नल आगगाडिचें
उपकरण्याला बघुन भाळतां जरि भगवन् कीरटीं
तरीं का तांबट थोडे हटीं
चांदी सोनें पांच हिऱ्याला जरि भगवन् भाळतां
तरी का सराफ हटिं बैसतां
उज्ज्वल तांब्या आसन लोंकरी घण घण वाजवि घांट
पुजेचा लांबवरी बोभाट
गुलाल बुक्का अबीर चंदन अष्टगंध अर्गजा
पाहिजे म्हणती गरुडध्वजा
जाइजुई ती बकुल मालती निशिगंधाचा तुरा
हारामधिं निव्वळ बटमोगरा
निरांजनें तीं दहा विस जळती नाश तुपाचा खरा
बदामी नैवेद्याला शिरा
अशी पुजेची करी कवाइत बहुरूप्याचे परी
भक्तिचें नांव नसे अंतरीं

भक्तिरसाविण असार सारें कुंकुमतिलकाविना
पहाती अशुभ जेविं कामिना
षडरिंकपाटा घाल गव्हारा वैराग्याची कडी
भक्तिच्या दे डोहामधिं बुडी
भेटेल मग तुज रमारमण अघशमन दयाघन हरी
उभा जो गणु म्हणे पंढरपुरीं ॥ १ ॥

पद

हे मना ! गड्यारे सज्जना उमज तूं कांहीं
या नरतनुसम पर्वणी दुजी बघ नाहीं ॥ ध्रु० ॥
गमविना अशी ही सुगी मुढा वाउगी सोय बघ आतां
जाशील अंतिं यमलोकिं खावया लाथा
नसे नसे लवहि भरंवसा बुडबुडा जसा उठे फुटे फटकन्
जोंवरीं तुझा बा प्राण तोंवरीं जाण सुहृज्जन साथी
लावून रिकामा मोह रौरवा नेती
राहतील जागचे जागिं शेत वाग बगी राहता वाडा
करिशील स्मशानीं शयन शेवटीं उघडा
तनुचा रे ! किती अभिमान वाहसी जाण गड्या मायेनें
परी काष्ठ शुभांचें तिला अखेरीं लेणें
गणुदास म्हणे रे मना ! भुलुं नको कुणा पंढरी राणा
घे करुन आपुला तरिच जगीं तूं शहाणा ॥ १ ॥

पद

कां मना उगा तूं नटसी
शाश्वत सारें जग गणिसी ॥ ध्रु० ॥

माया बसली न्याया निरया—
तुज, नको भुलूं तूं हिजसी कां मना० ॥ १ ॥
काळ घडीघडिं आयुस नेतो
कां यासी, नच पाहसी कां मना० ॥ २ ॥
कणि नाहीं जगिं याही तव पाही, लवलाही
गणु म्हणे शरण जा गुरुसी कां मना० ॥ ३ ॥

पद

मना ! तुजपाशींरे तुजपाशीं भेटविणें हृषिकेशी ॥ ध्रु० ॥
पापाचरणा तूंच करविसी, तूंच रौरवा नेसी
सुखदुःखाला कारण तूंची ठाइं ठाइं फसविसी ॥ १ ॥
काम कोप मदमत्सर वैरी दे फांटा झणिं यांसी
दास गणू तुज नित्य विनवितो, ने मज वैकुंठासी ॥ २ ॥

पद

मना सज्जना ! सावध व्हावें गाफिल वेड्या ! राहुं नको
अमोल ऐशा नरदेहाला येउनि वायां जाउं नको०
स्वस्वरुपाला विसरुं नको
हरि-भजनाला टाकुं नको
अंगिं अहंता वाहुं नको !
जग हें शाश्वत मानुं नको
'माझें माझें' म्हणून ओझें व्यर्थ शिरावर घेउं नको
काम-कर्दमीं लोळुं नको
सन्मार्गातें टाकुं नको

नीच कुणाला लेखुं नको
अभिमानाधिन होउं नको
तूं एक खंडिला रती न पुरती तत्व कधीं हे विसरूं नको ॥२॥

गप्पा ठोकित फिरूं नको
अपुलि पायरी सोडुं नको
भवसागरिं या पचूं नको
वेळ रिकामा दवडुं नको
अपुल्याच्यानें होइल ऐसें काम कुणाला सांगुं नको ॥ ३ ॥

द्वेष कुणाचा करूं नको
अशुभ पराचें चिंतुं नको
ऋण काढुन सण करूं नको
अढीबाज तूं होऊं नको
मृण्मय देहा घालुन कपडे बैलोबापरि सजूं नको ॥ ४ ॥

ऐट उसनी आणुं नको
छानछोकिनें राहुं नको
साधेपण तें सोडुं नको
घात कुणाचा करूं नको
निज कृत्यानें जननिंदेला पात्र रिकामा होउं नको ॥ ५ ॥

स्त्रियांमधें कधिं बसूं नको
मोह कुणाचा वाहुं नको
दोष कुणाचा पाहुं नको
आशा-पाशीं गुंतुं नको
घरचा पुरुष घरीं नसतां घरीं कुणाच्या जाउं नको ॥ ६ ॥

दांभिक भक्ति करू नको
शाब्दिक ज्ञाना सेवुं नको
अनुभवाविण बोलुं नको
निज वचनाला विसरुं नको
शिष्य आपुला झाला म्हणुनी नीच काम त्या सांगुं नको ॥७॥

उगीच तर्कटिं पडुं नको
वादविवादा करूं नको
भक्तिपथाला सोडुं नको
वारि कराया चुकूं नको
खोटें नाटें सांगुन कोणा पोट कुणाचें फुगउं नको ॥ ८ ॥
नीच संगती धरूं नको
व्यसन कशाचें पाळुं नको
बे अब्रूनें चालुं नको
लीनतेला सोडुं नको
दास गणूचा ऐकूनि फटका तसें वागण्या चुकूं नको ॥ ९ ॥

शके १८५० चे श्रीगुरु पौर्णिमेचे उत्सवांत श्रींचे समाधीसमोर वाचलीं गेलेलीं रा. रा. कृष्ण जागेश्वर भीष्मकृत पदें श्लोक वगैरे

## सद्गुरूस नमन

नमो नमो भगवन्वाङ्मनातीत रूपधर शक्ति अनंत ।
आदमध्यमीना कछु तुमको ऐसे हौ तुम ईश अनंत ॥ धृ० ॥१॥
निर्गुण नीराकार महात्मन्सकलभूतके तुम कारन ।
लोकनके हितकारज करने सगुनरूप करते धारन ॥ १ ॥
अपरमीत परमान आपका ऐसे कहते सब सज्जन ।
पूजार्चन जप भजन नमनमें तप करता तुमको कारन ॥ २ ॥
पारतंत्र्यसे अधःपतननित होत पीरकर रणकंदन ।
कहत कृष्ण तुम केरदास जगपीरन सायन हौ बलवंत ॥ ४ ॥

## सद्गुरू महती

( गुरुकृपांजन या चालीवर )

सद्गुरु वाचोनी तारक जगतीं । इतर न कोणीही पंडित वदती ॥धृ०॥
संसार मोहक बचनाग जाणा । मारक तारक सद्गुरु राणा ॥ १ ॥
शिळधींत राहूनी दुर्गुण नाशी । तारीत नतजन तो अविनाशी ॥ २ ॥
भवरोग दुस्तर पीडित ज्याला । करित निरामय सद्गुरु त्याला ॥ ३ ॥
कृष्ण म्हणे साई सच्चिदानंद । तारील तोडोनियां भवबंध ॥ ४ ॥

## सद्गुरूचा धांवा

येई येई बा गुरुराया । आर्तभक्त ताराया ॥ धृ० ॥
तुजविण परदेशी या जगतीं । झालों कोणि न पुसती ॥ १ ॥

निर्गुण सगुणरूपी तूं नाथा । राहो तव पदिं माथा ॥ २ ॥
दुस्तरपर माया जन भजती । व्यसनीं जाउनि पडती ॥ ३ ॥
कृष्णानंद नमीत तव पाया । जन्ममरण चुकवाया ॥ ४ ॥

## शेवटील प्रार्थना

भुजंगप्रयात

जया पासुनी विश्व निर्माण झालें ।
जयानें पुनः सर्वही व्यापियेलें ॥
असे ब्रह्म तूं एक देवा तुला मी ।
नमूनी स्तवी बाल सौराष्ट्र कामी ॥ १ ॥
वसे ब्रह्म तेजस्विता ब्राह्मणांत ।
असे विप्र या राष्ट्रिं होवो बहूत ॥
शरींशूर राजन्य होवो तसाची ।
सहस्रादिका मारि जो एकलाची ॥ २ ॥
बहू दुग्ध देतील ऐशाचि गाई ।
बलीं वर्ध ही पीन हो ठाई ठाई ॥
त्वरें लंघिती दुर्गवा खंदकाला ।
अशा जागजागीं वसो अश्वशाला ॥ ३ ॥
गुणी योषिता शील सौंदर्यखाणी ।
विभो होउं दे भारतीच्या ठिकाणीं ॥
यशोदुंदुभी वाजणें हाचि ठेवा ।
असे हे रथी भारतीं होवु देवा ॥ ४ ॥
कराया सभा हौस वाटे जयाला ।
मनीं थोडिही भीति ना बोलण्याला ।

सरी भाषणीं जो करीतो गुरूची ।
युवा आमुचे राष्ट्रिं होवो सदाची ॥ ५ ॥

तुझी भक्ति जे नित्य भावें करीती ।
उदासीन वत्सर्वसंसार रीती ॥
करीती तया वीर्यशाली पवित्र ।
तुझ्यासारिखा होउ देवा सुपुत्र ॥ ६ ॥

यथाकाल भूमीवरी मेघधारी ।
करो वृष्टि जो दैन्य दारिद्र्य वारी ॥
फलें युक्त या औषधी पक्व वाहो ।
तये आमुचा देश संपन्न राहो ॥ ७ ॥

करूं प्राप्त वा नष्ट त्या वैभवासी ।
पुढें रक्षुं जे प्राप्त होई करासी ॥
असा योग हा क्षेम राष्ट्रांत राहो ।
विनंती असे जोडुनीया करा हो ॥ ८ ॥

शा. वि.

केली जे स्तुति या जुषीं मुनिवरें राष्ट्रोन्नती कारणें ।
त्याची सांगितली फलश्रुति बरी तैत्तेरियीं ब्राह्मणें ॥
घेवोनी श्रुतिभाव अल्प मति जी मराठी स्तुती ।
होवो पाठक तृप्त कृष्ण कवनें चिंतूनियां श्रीपती ॥९॥'

## ॥ श्री साईनाथाय नमः ॥

रा. रा. संपादक—**श्रीसाईलीला** यासः—सप्रेम सा. न. वि. वि. आपल्या सन्मान्य श्रीसाईलीलेच्या एखादे अंकीं खालीं लिहिलेल्या अनुभवास कृपेने स्थल मिळावे अशी नम्रपूर्वक विज्ञप्ति आहे.

माझ्या पायाना इसबासारखी कांहीं तरी इजा होती. मी पुष्कळ औषधें लावून पाहिलीं; पाय तात्पुरते बरे होत असत. व पुन्हा पायांना खाज उठून ते पूर्वस्थितीवर येत. औषधोपचार करून कंटाळा आल्यानंतर मला सुदैवानें श्रीसाईबाबांच्या उदीची आठवण झाली; मी उदी मिळविली व श्रीसाईनाथांचें मनःपूर्वक स्मरणकरून माझ्या पांयांस लाविली. पंधरा-वीस दिवसांत पाय कायमचे बरे झाले. साईनाथा, कमाल आहे तुमच्या लीलेची! श्रीरामा पांडुरंगा, धन्य धन्य आहे तुमच्या त्या अगाध लीलेची!!!

आपला,

वसई<br>जि. ठाणें } **सदाशिव रामचंद्र गाळवणकर.**

॥ सद्गुरु श्रीसाईनाथाय नमः ॥

### श्रीसाई-प्रार्थना.

( शा. वि. )

**साईनाथ तुला सदा करितसें ऐशीच रे प्रार्थना ।**
**ईशा बुद्धि मला सदैवचि असो ठाई जिच्या स्वार्थ ना ॥**
**नाहीं मागत कांहिंही परि सदा देईंच सद्वासना ।**
**थट्टा-मस्करि या गुणास निववी, दे भक्तिची भावना ॥**

( मालिनी–वृत्त )

नच मज मम साई कांहीं दे, वासना दे ।
अशिच परि सदाजी सर्व लोकां सुखा दे ॥
मम तनु झिजवी वा लोकसेवेत देवा ।
तदपि तव तनूशीं देह हा एक व्हावा ॥

( स्रग्धरा-वृत्त )

श्रीरामा पांडुरंगा, कितितरि स्तवुं मी त्या तुझ्या गोड लीले ।
लीला पाहूनि तूझी तुजसि कवळण्या चित्त हें वा भुकेले ॥
प्रार्थीतों तूजला कीं तव मुखकमला दाखवीं साइदेवा ।
स्वप्नामध्यें तरी रे; मजसि नच कळे राग कां त्वां करावा ॥

(शा. वि.)

ज्यानें बुद्धि दिली कवित्व करण्या साईस वंदीतसे ।
माझ्या या अति अल्प लीन मतिच्या काव्यास अर्पीतसे ॥
ऐशी आस परी खरोखरि करी स्वीकारि जो सज्जन ।
काव्याला उपयुक्त या, नच तरी साई दयेचा घन ॥

**वासुदेव एल्. गवाणकर**

श्री

बानुटेरेस-ताडदेव,
मुंबई-तारीख २९ जुलै १९२८

श्रीयुत संपादक " श्री साईलीला " यास—

सा. न. वि. वि.

मी साईबाबांचा एक भक्त असून आपले मासिक लक्षपूर्वक वाचीत असतो. म्हणून खालील मजकूर आपणास लिहीत आहे त्याचा विचार व्हावा.

संपादक या नात्याने आपला वर्तमानपत्रें वाचण्याचा व्यासंग असेलच व त्यावरून हल्लीं कित्येक दिवस मराठी-इंग्रजी वर्तमानपत्रांतून गाजत असेली गुरुबाजी व श्री उपासनी प्रकरण याची माहिती आपणास नसावी हे संभवत नाहीं. खंडो-उपासनीने आपली कन्या आपल्या गुरूला (श्री उपासनीला ) अर्पण केल्यापासून, उपासनींच्या लीलांना एक प्रकारचे वैशिष्ट्य येऊन, वर्तमानपत्रांत हल्लीं खळबळ उडाली आहे, परंतु आपल्याला उपासनींच्या लीलांची माहिती फारां दिवसांपासून असली पाहिजे. विशेषेकरून त्यांत श्री साईबाबांचा संबंध येत असतां आपण त्या संबंधानें अजपर्यंत मूग का गिळलेत हे कळत नाहीं. आपण श्रीसाईलीला सुरू केलीत, त्यावर उपासनी-पंथाने ' साई वाक्सुधा ' सुरू केली, तरी आपण गप्पच. वाक्सुधा प्रथम मासिक स्वरूपांतच सुरू झाली व नंतर पुस्तकरूपाने बाहेर पडली. श्री उपासनींचे चरित्र प्रसिद्ध झाले, त्यांत श्री साईबाबांच्या भक्तांवर शितोडे उडविले तरी आपण गप्पच. आपण श्री साईलीलेंत वेळोवेळीं निरनिराळ्या पुस्तकांवर अभिप्राय देऊन मार्मिक टीकाही केली आहे. मग उपासनी-चरित्र आपल्या दृष्टिपथातून कां चुकले? या आपल्या मुग्ध वृत्तीचा अर्थ, आपलीही उपासनी-पंथाला सहानुभूति आहे असा कोणीं केल्यास ( व त्याप्रमाणें कित्येकजण करीतही आहेत ) हा दोष कोणाचा? वास्तविक आपला श्री उपासनींशीं संबंध जास्त. ते स्वतःला साईबाबांचा एक शिष्य म्हणवितात. साईबाबांच्या नांवावर शिर्डीपासून ३ मैलांवर त्यांनीं आपला मायावी बाजार

उघडला व त्यांत पुष्कळ भोळीं सावजे पकडलीं. आपण जर वेळींच या दंभाचा परिस्फोट केला असता, तर या 'भार्या-कन्या-अर्पण' विधीपर्यंत मजल खास गेली नसती असे मला व माझ्या इतर मित्राना वाटत आहे. तेव्हा आता तरी आपण यासबंधीं स्पष्ट खुलासा करावा अशी माझी आपणास कळकळीची विनंती आहे. कळावे, लोभ असावा ही विनंती.

आपला नम्र

**भगवान दामोदर जोशी.**

*** वर दिलेल्या रा. जोशी याच्या पत्राप्रमाणे आणखींही काहीं पत्रे आमच्याकडे आलीं आहेत. काहींनीं उपासनीबुवाचा शिर्डीशीं काय संबंध होता ती माहिती प्रगट करावी अशी मागणी केली आहे. म्हणून आम्हाला आता या विषयाकडे वळणे भाग पडत आहे.

श्रीसाईलीला मासिक आम्हीं सुरू केले ते महाराजांसंबंधीं वेळोवेळीं त्यांच्या भक्ताना आलेले अनुभव, महाराजासंबंधी असलेले किंवा तयार होणारे वाङ्मय, व त्या ध्येयाला पोषक असे इतर धार्मिक विषय एके ठिकाणीं संकलित करण्याच्या हेतूने केलें. दुसऱ्यावर टीका करणें, कोणाच्या "दंभाचा परिस्फोट" करणे, यापासून अलिप्त राहणेच आम्हाला श्रेयस्कर वाटलें व अजूनही वाटत आहे. हिंदुस्थानांत, विशेषेकरून आपल्या महाराष्ट्रांत साधुसंत पुष्कळ आहेत. त्यात जसे खरे सत्पुरुष आहेत, तसे दांभिकही आहेत. त्यांची जर आम्हीं छाननी करूं लागलो, तर त्या कार्याला श्रीसाई-लीला अपुरीच पडेल. ईश्वरप्रणित अथवा सृष्टिजन्य वस्तूंत, अग्निसारख्या क्वचित् शुद्ध स्वरूपांत निर्माण झालेल्या वस्तु वगळल्यास सगळींकडे शुद्धा-शुद्धाची मिसळ सांपडेल; व त्यातून शुद्ध स्वरूप कोणते व अशुद्ध स्वरूप कोणते त्याची पारख करण्याकरितां अवश्य असलेली जी बुद्धि, ती ईश्वराने मानव जातीलाच दिली आहे. पश्वादिकाना ही देणगी मिळाली नाहीं, व म्हणून मनुष्यांत व पशूंत जो मोठा फरक आहे तो हाच आहे. मनुष्याने जर आपल्या बुद्धीचा उपयोग केला नाहीं, तर त्याच्यांत व पशूंत अंतर न

राहून, त्याच्या हातून साहजिकच पशुतुल्य कृत्ये घडतात. मनुष्याने बुद्धीची कसोटी लावल्यास सत्पुरुष कोण व दांभिक कोण याचा त्याला उलगडा होईल. ती न लावल्यास त्याच्या हातून " कन्या--भार्या-अर्पण-विधि " सारख्या आचरटपणाशिवाय दुसरे काय होणार ?

सत्पुरुषाचीं लक्षणे काय असतात त्याचे वर्णन समर्थ रामदासस्वामी, तुकाराम महाराज वगैरे संतांनीं आपआपल्या ग्रंथातून केलेले आहे. एकनाथी भागवतांत, एकनाथ महाराजानीं या विषयावर तर फारच मार्मिक विवेचन केले आहे परंतु अलीकडील " गुरु-बाजी"वर भाळलेली मंडळी हे ग्रंथ पाहतील तेव्हा ते त्याना कळणार ! हल्लींचा काळच असा आला आहे कीं, एखाद्या धूर्त मनुष्याने सत्पुरुषाचें सोंग घेतले कीं, त्याला शिष्याला तोटा नाहीं. ही शिष्यमंडळी खरोखरच अंधश्रद्धेने त्याचे चेले बनतात व तो धूर्त सद्गुरु ( ? ) त्यांचा पूर्ण फायदा घेत असतो. अमके एक साधू गांवात आले आहेत असे कळण्याचा अवकाश, कीं स्त्रीपुरुषांच्या झुंडीच्या झुंडी त्याच्या दर्शनाला धांवतात. हेच उपासनी बुवा एकदां मुंबईत वाळकेश्वरीं आले असताना त्यांच्या दर्शनाला लाखों माणसे येऊन गेलीं असें प्रसिद्ध झाले होतें. परंतु यापैकीं क्वचित् कोणी हे खरेंच सत्पुरुष आहेत कीं कोणी दांभिक आहेत याचा विचार केलेला असेल. एक सत्पुरुष गांवांत आले आहेत अशी कर्णोपकर्णीं बातमी ऐकली ( ही बातमी बुवाची शिष्यमंडळीच पसरवित असतात ) कीं दर्शनाला झुंडीच्या झुंडी जातात. दर्शनाला येणाऱ्या मंडळींत पारमार्थिक हित करून घेणारा क्वचितच कोणी असतो. मला पुत्र व्हावा, मला द्रव्यप्राप्ती व्हावी, माझे योजिलेलें कार्य व्हावे अशा हेतूने आलेलाच बहुजनसमाज असतो. बुवा धूर्त असतात व साधारण कल पाहून आशीर्वाद देतात. ज्योतिषाच्या भविष्याप्रमाणे कांहींना दिलेले आशीर्वाद सफल होतात, कांहींचे निष्फल होतात. सफल आशीर्वाद झालेली मंडळी बुवांचे स्तुतिपाठ गाऊं लागतात, निराश झालेली मंडळी आपल्या कर्माला दोष देतात, व सत्पुरुषाची निंदा करण्याला धजत नाहींत. त्याचा परिणाम बुवांना इष्ट असाच होतो. अशा रीतीनें बुवांची

एकदां प्रसिद्धि झाली कीं, तो आजन्म सत्पुरुप बनतो. अशा तऱ्हेनें बनलेल्या सत्पुरुषांची महाराष्ट्राला तरी वाण नाहीं. उपासनीबुवा हे याच कोटींतील एक सत्पुरुप (?) बनले आहेत, असे त्यांच्याच कृतीवरून अनुमान काढण्यास जागा आहे. उपासनीबुवा काहीं काल शिर्डीत राहिले होते, याशिवाय त्यांचा शिर्डीशीं काहीं संबंध नाहीं प्रसंग पाहून, कांहीं वेळां उपासनीबुवा साईबाबाचे शिष्यत्व कबूल करितात व कांहीं वेळां साईबाबा आपले गुरू नव्हेत असेही प्रतिपादन करितात. श्री साईबाबांचे अंतरसाक्षित्व पटलेले भक्त उपासनी बुवांकडे जात नाहींत, मग त्याच्या भजनीं लागणे तर दूरच राहिले.

रा. जोशी आपल्या पत्रात लिहितात कीं, उपासनी बुवांच्या दंभाचा आम्हीं वेळींच परिस्फोट केला असता तर भार्या-कन्या-अर्पण विधीपर्यंत मजल गेली नसती. रा. जोशी यांचा हा भ्रम आहे. आज सर्व वर्तमानपत्रांनीं उपासनी बुवांवर हल्ला चढविला आहे, त्यांच्या साई वाक्सुधेतील उतारे देऊन, त्यांतील प्रतिपाद्य विषयांचा तीव्र निषेध केला आहे, भार्या-कन्या-अर्पण विधीवर कडक टीका केली आहे, तरीही रा. जोशी जर साकोरीस जाऊन पाहतील, तर उपासनी नगर पूर्वीप्रमाणेच पूर्ण गजबजलेले त्याना दिसेल तरुण मुलींचें त्यांच्या आश्रमांतील प्राबल्य, रासक्रीडेप्रमाणे तेथें होत असलेले टिपऱ्याचे खेळ वगैरे तेथील प्रकार त्यांच्या भक्तमंडळींना प्रत्यक्ष पाहण्यास सांपडत असूनही जर त्यांची शिष्यशाखा वाढत चालली होती, तर आमच्या लिहिण्याचा त्यांच्यावर कांहीं परिणाम झाला नसता हे उघड आहे. उलट पक्षीं, जर आम्हीं उपासनी बुवासंबंधीं कांहीं लिहिले असते, तर त्यांचा होत असलेला उत्कर्ष आम्हांस सहन होत नाहीं व द्वेषबुद्धीनें आम्हीं त्यांच्यावर टीका करतों असा आरोप आमच्यावर आला असता. याच हेतूनें आम्हीं त्यांच्या चरित्रावर टीका केली नाहीं. त्यांच्या चरित्रांत पुष्कळ गोष्टी अशा आहेत कीं, ज्या वाचून उपासनी बुवांची खरी योग्यता कोणालाही ठरवितां येईल. मासल्याकरिता आम्हीं त्यातील एक उतारा येथें देतो.

> " एकदां तर एका गुरुवारीं जानकीबाई नांवाची एक विधवा स्त्री त्यांच्या ( उपासनी बुवांच्या, दर्शनाकरितां पूजासाहित्य घेऊन आली. खोलीच्या बाहेर तिनें आपलें वस्त्र फेडून ठेवून नग्न होऊन ती आंत गेली आणि निर्विकल्प मनानें तिनें महाराजांची पूजा केली. तें पाहून इतर स्त्रियांनीं तिला फार दूषण दिलें. परंतु महाराजांनीं त्याचें निरसनच केलें. इतक्या मंडळींत निर्विकल्प मनानें नग्न होऊन पूजा करणें ह्या भक्ताच्या समुद्राप्रमाणें गंभीर अंतःकरणाचें काय वर्णन करावयाचें ? "
>
> ( उपासनी चरित्र, पान २७० )

अशा तऱ्हेचे त्या चरित्रांत किळसवाणे बीभत्स प्रकार बरेच आहेत. एकदा एका चांभाराने आपली बायको महाराजांना अर्पण केल्याचा उल्लेखही त्या चरित्रांत आहे. हें चरित्र, उपासनी बुवानी साकोरीस जे 'उपासनी नगर' वसविले आहे त्याची मुहूर्तमेढ आहे. उपासनी बुवाच्या साधुत्वाचा पाया महाराष्ट्रांत याच चरित्रानें घातला. या चरित्राचे गुजराथींत भाषांतर झालेलें आहे, व त्यामुळे कित्येक गर्जर व पारशी मंडळीही उपासनी बुवांच्या शिष्य शाखेंत मिसळली आहेत. अशा या अमोल ग्रंथाची आजपर्यंत आम्हीं उपेक्षा कां केलीं याचे कारण आम्हीं वर दिले आहे. परंतु ज्या अर्थी, रा. जोशी म्हणतात त्याप्रमाणे आमच्या मुग्धपणामुळें लोकांत गैरसमस उत्पन्न झाला आहे, त्या अर्थी आम्हीं पुढील अंकांत या अपूर्व ग्रंथाचे परीक्षण करण्याचें ठरविले आहे.

" साई वाक्सुधा " हा उपासनी बुवांचा, त्यांच्या मुखांतून निघालेला स्वतंत्र ग्रंथ आहे. प्रथम हें मासिक होतें. श्रीसाईलीला बाहेर पडल्यावर, तिला तोडीस तोड म्हणून हें मासिक साकोरीस जन्मास आलें. पुढें मासिक स्वरूप बदलून, ' साई वाक्सुधा ' ग्रंथरूपानें बाहेर पडूं लागली.

साईबाबाचे नांव या पुस्तकाला जोडले आहे, परंतु नावाशिवाय, त्याचा या पुस्तकाशीं कोणताही संबंध नाहीं. इतकेच नव्हे तर वाक्सुधेतील प्रतिपाद्य विषय, श्रीसाईमहाराजांनीं त्याच्या अनेक भक्तास वेळोवेळीं निरुपिले गेलेल्या पारमार्थिक तत्वाशीं अगदीं विसंगत आहेत. लोकांची दिशाभूल करून पुस्तकाला ग्राहक मिळावे या उद्देशाने या अमंगल ग्रंथाला 'साईवाक्सुधा' हें नांव दिलेले असावे असे आम्हांस वाटते.

वरील विवेचनानंतर उपासनी-पंथाला आमची सहानुभूति असणे शक्य नाहीं हे उघडच दिसून येईल.

—संपादक

( १ )

**बापुराव बोरावके**—यांचें मूळ गांव पुण्याजवळील सासवड हे होय. यांचे वडील व मातुःश्री ते लहान असतांना वारले व नातेवाईकांनीं त्यांच्या अज्ञान अवस्थेचा पूर्ण फायदा घेऊन, त्यांची वडिलोपार्जित मिळकत समूळ नाहींशी केली. बापुरावांचे शिक्षण पुण्यास प्रवेशपरीक्षेपर्यंत झाले. वडिलोपार्जित जमीनजुमला नाहीं व शिक्षण पुरे करण्याची सोय नाहीं, तेव्हा तिसरा राजमान्य चरितार्थाचा मार्ग नोकरी व त्याचे अवलंबन करण्याचे त्यांच्या मनात आले. या सुमारास शिर्डीस पाटाच पाणी आलें व शिर्डीच्या आसपास बरीचशी ऊंसाची लागवड झाली. बापुरावाचे मामा ऊंसाच्या लागवडीच्या धंद्यांत मुरलेले असल्यामुळे, त्यांनीं शिर्डीजवळ ऊंसाची लागवड केली होती व त्यामुळे त्यांचे वास्तव्य तेथे झालें होतें. त्यांची श्री साईनाथ महाराजावर निष्ठा जडून, ते महाराजांचे भक्त झाले होते. मामामुळें बापुरावांना महाराजाची माहिती झाली व महाराजाच्या दर्शनाला जाण्याची त्यांना उत्सुकता झाली. कशी तरी कोपरगावापर्यंत आगगाडीच्या भाड्याची सोय करून ते पुण्याहून शिर्डीस येण्याकरितां निघाले. त्यांना महाराजांच्या दर्शनाचा इतका ध्यास लागला कीं, नगर जिल्ह्यांत प्रवेश केल्यावर महाराजांचें दर्शन घडण्यापूर्वी अन्नग्रहण